# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2012-2014

**YEAR : 37)** **1st October 2012 (No. of Pages 12 )** **( No : 09**

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)**

## महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक १६ सप्टेंबर २०१२ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेला ठराव

**१. महाराष्ट्राच्या मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी राज्याच्या मुख्यसचिवांच्या उपस्थितीत दिलेल्या लिखित आश्वासनाचे पालन केले जात नाही, त्यांनी राज्याच्या मा.मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत दिलेल्या लिखित शब्दांची अंमलबजावणी केली जात नाही, यामुळे महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला आहे.** सचिवालयांत उच्च शिक्षण विभागामध्ये काम करणाऱ्या मध्यम दर्जाच्या अधिकाऱ्यांनी मंत्रिमहोदयांची फजिती व्हावी म्हणून योजिलेल्या अनेक कारस्थानातून ही स्थिती निर्माण झालेली आहे. याचे भरपूर पुरावे महासंघाजवळ आहेत, हे खरे असले तरी याबाबत कर्तव्य पार पाडण्यात मा. उच्च शिक्षणमंत्र्यांना संपूर्णपणे अपयश आलेले असल्यामुळे ते याबाबतची आपली जबाबदारी झटकू शकत नाहीत, हे स्पष्टपणे नमूद करणे या महासंघाला आवश्यक वाटते.

**२.** उपरोक्त नोकरशाहीने उच्च शिक्षणामध्ये जो धुडगूस घातला त्याचे थोडक्यात वर्णन करावयाचे झाल्यास विद्यापीठ कायदा, विद्यापीठांचे परिनियम, अस्तित्वात असलेले कायदे, मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय, विद्यापीठ अनुदान आयोगाचे निदेश व निर्णय, केंद्र शासनाचे निदेश, प्राध्यापक महासंघ व राज्यशासन यांच्यात स्वाक्षरीत झालेले मतैक्यपत्र या सर्वांच्या विरोधात जावून **उच्च शिक्षण विभागातील नोकरशाहीने सन १९९१ ते २००० या काळातील नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत एकामागून एक जवळ जवळ डझनभर बेकायदेशीर आदेश काढलेत. हे आदेश संपूर्णपणे बेकायदेशीर असल्यामुळे त्यातील प्रत्येक आदेश अत्यंत नामुष्की होवून शासनाला परत घ्यावा लागला.** त्या त्या वेळी उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये जो असंतोष निर्माण झाला, जी आंदोलने झाली त्यातून निर्माण झालेल्या अशांततेच्या पोटी उच्च शिक्षण क्षेत्राचे जे नुकसान झाले त्याची तर मोजदादसुद्धा करता येणार नाही. महाराष्ट्र राज्याच्या नुकत्याच संपलेल्या सूवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त निर्गमित केलेले आदेश एकामागून एक मागे घ्यावे लागण्याच्या नामुष्कीची स्पर्धा आयोजित केली आणि अशा स्पर्धेसाठी कोणालाही 'रेफरी' नेमले तरी उच्च शिक्षण विभागालाच पहिले बक्षीस मिळेल याविषयी शंका असण्याचे कोणतेही कारण नाही.

**३.** महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षापर्यंतचा आढावा घेता लिखित आश्वासनांचे पालन न करण्याच्या बाबतीत स्पर्धा आयोजित करतो म्हटले तर त्या स्पर्धेमध्येसुद्धा कोणालाही 'रेफरी' नेमले तरी उच्च शिक्षण विभागाचाच पहिला क्रमांक लागेल हे निःसंशय होय. **उच्च शिक्षण विभागाच्या वतीने डझनाच्यावर लिखित स्वरुपाच्या मुदतबंद आश्वासनांची व अभिवचनांची पूर्तता होत नाही ही गोष्ट निश्चितपणे त्या खात्याचा लौकिक वाढविणारी नाही.**

**४.** शासन निर्णय निर्गमित व्हावा म्हणून अनेक संघटना आंदोलने करतात, तसेच महाराष्ट्र प्राध्यापक महासंघानेसुद्धा यापूर्वी अनेकदा अशी आंदोलने केलेली आहेत. तथापी **अनेक शासननिर्णय वित्त विभागाच्या व मंत्रीमंडळाच्या मान्यतेने निर्गमित होऊनसुद्धा त्यांची अंमलबजावणी करावी म्हणून प्राध्यापक महासंघावर वारंवार आंदोलने करण्याची वेळ येते याबाबतीतसुद्धा उच्च शिक्षण विभागाचाच प्रथम क्रमांक येईल.**

**५.** केंद्र शासनाने दिनांक १४ ऑगस्ट २०१२ रोजी शासन निर्णय (No. F. 1-7/2010-U.II) काढून सर्व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना (नेट-सेट मुक्त शिक्षक धरून) १ जानेवारी २००६ पासून पुढील ४-५ वर्षासाठी नवीन वेतनश्रेणीच्या थकबाकीपोटी येणाऱ्या रकमेच्या ८० टक्के रक्कम अंशदान म्हणून महाराष्ट्र शासनाला देऊ केली असतांना शिक्षकांविषयी उच्च शिक्षण विभागातील नोकरशाहीच्या मनात असलेल्या आकसपूर्ण भावनेमुळे केंद्रातून ही रक्कम आणण्यासाठी काय केले पाहिजे हे उच्च शिक्षणमंत्र्यांना सांगण्यास सुद्धा कोणी तयार नाही. **उच्च शिक्षण खात्याच्या उपरोक्त आकसपूर्ण धोरणामुळे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला पुन्हा आंदोलनाचा कार्यक्रम घोषित करावा लागत आहे याचे या महासंघाला मनापासून दुःख होत असले तरी याशिवाय कोणताही पर्याय उरलेला नसल्यानेच हा आंदोलनाचा कार्यक्रम घोषित करण्यात येत आहे.**

**६.** "महाराष्ट्र राज्याच्या नुकत्याच संपलेल्या सूवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त निर्गमित केलेले आदेश एकामागून एक मागे घ्यावे लागण्याच्या नामुष्कीची स्पर्धा आयोजित केली आणि अशा स्पर्धेसाठी कोणालाही 'रेफरी' नेमले तरी उच्च शिक्षण विभागालाच पहिले बक्षीस मिळेल याविषयी शंका असण्याचे कोणतेही कारण नाही." असा उल्लेख वर परिच्छेद २ मध्ये आलेला आहे. याबाबतची तपशिलवार माहिती पुढील

### मा. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत

## "सदर बाब अशीच स्विकृत करावयाचे ठरले."

### तर मग नक्की अडले कुठे?

*(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या रविवार, दिनांक १६ सप्टेंबर २०१२ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेल्या ठरावातील परिच्छेद ७.१३ ते ७.१६ पहा)*

उपपरिच्छेदातून दिलेली आहे.

**६.१** जे करायला पाहिजे होते ते केले नाही आणि समझोत्यामध्ये, कायद्यामध्ये, नियमामध्ये, यु.जी.सी.च्या किंवा केंद्रशासनाच्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये, मान्य झालेल्या समग्र योजनेमध्ये, अंतर्भूत नसलेल्या अनेक गोष्टी करण्याचा एकामागून एक सपाटा आमच्या नोकरशाहीने महाराष्ट्रामध्ये सुरू केला.

**६.२** विद्यापीठ अनुदान आयोग सातत्याने राज्य शासनाला कायद्याने नेटसेट 'पात्रता परीक्षा' म्हणून लागू करा, अशी वारंवार विनंती करीत होते. त्याबाबतची कोणतीही कायदेशीर कारवाई न करता १९ सप्टेंबर १९९१ चे विद्यापीठ अनुदान आयोगाचे रेग्युलेशन आल्याबरोबर **२३ ऑक्टोबर १९९२ रोजी एक आदेश काढून नेटसेट सक्तीचे असल्याचे नोकरशाहीने जाहिर केले.** ही पूर्णपणे बेकायदेशीर कृती असल्याचे संघटनेने राजकिय नेतृत्वाच्या लक्षात आणून दिल्यावर २७ नोव्हेंबर १९९२ च्या आदेशाने २३ ऑक्टोबरचा आदेश रद्द करण्यात आला.

**६.३** महाराष्ट्रात 'सेट'ची एकही परीक्षा संचालीत करण्यात आलेली नव्हती. अनेक विषयामध्ये केंद्रिय पातळीवरसुद्धा 'नेट'ची परीक्षा संचालीत करण्यात आलेली नव्हती. अशा स्थितीत "**नेट सेट परीक्षा उत्तीर्ण केली असेल तरच ३१ मार्च १९९४ नंतर त्यांना सेवेत ठेवण्यात यावे**" असा पहिला हूकुम २ फेब्रुवारी १९९४ च्या शासन पत्रान्वये काढण्यात आला. असा आदेश काढणे हे संपूर्णपणे बेकायदेशीर पणाचे होते.

**६.४** "**३१ मार्च १९९५ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा**" असा दुसरा आदेश ७ मार्च १९९४ च्या पत्रान्वये देण्यात आला. चुकीच्या बेकायदेशीरपणाची ही पूनरावृत्ती होती.

**६.५** त्यानंतर "**३१ मार्च १९९६ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा**" असा आदेश २० मार्च १९९४ च्या शासन पत्रान्वये देण्यात आला.

**६.६ विधीनियमांनी व परिनियमांनी केलेली व्यवस्था पत्रांनी मोडून काढण्याच्या या प्रकाराने शेकडो शिक्षकांना गेली अनेक वर्षे अत्यंत मानसिक तणावात काढावी लागली आहेत.** २ फेब्रुवारी १९९४ ते २०

## MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

*Registered under the Trade Union Act 1926. No By II-8162 of 1985*
*Affiliated to the All India Federation of University and College Teacher's Organizations (AIFUCTO)*
**Vidyapeeth Vidyarthi Bhavan, 'B' Road, Churchgate, Mumbai – 400 020**

**PRESIDENT**
Prof. Shivajirao Patil
SHIVAI 39 Rewu Nagar, Dheku Road,
Amalner 425 401, District Jalgaon
(9422278418)

**GENERAL SECRETARY**
Dr. Tapati Mukhopadhyay
Park Side 3, Wing, Flat No. 1308 Kulupwadi
Road, Borivali (East) Mumbai 400 066
(022-28871430, 9820319455)

**दिनांक : २४ सप्टेंबर २०१२**

प्रति,
**मा. ना. राजेशजी टोपे,**
उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

महोदय,

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या दिर्घकाळ प्रलंबित मागण्यासाठी सातत्याने संघर्ष करीत आहे. या मागण्यांच्या पूर्ततेसाठी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने आंदोलन पुकारले असतांना आपण मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण या नात्याने तसेच मा. मुख्यमंत्री यांच्या हस्तक्षेपाने लिखीत मुदतबंद आश्वासने दिली होती म्हणून आंदोलन मागे घेण्यात आले होते. या मुदतबंद आश्वासनानुसार नेट/सेट मुक्त प्राध्यापकांचा दिर्घकाळ प्रलंबीत प्रश्न पुर्णपणे व कायमचा सोडविण्याकरीता जुन २०१२ अखेरपर्यंत निर्णय घेण्यात येऊन शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल तसेच सहाव्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतनश्रेणीनुसार प्राध्यापकांना देय असलेल्या थकबाकीतील २० टक्के रक्कम अदा करण्याबाबत (जी पूर्णपणे राज्य शासनाची जबाबदारी आहे) व केंद्र शासनाकडून ८० टक्के रक्कम मिळविण्याच्या बाबतीत देखील आश्वासन दिले होते. **आता केंद्र शासनाने याबाबत आपल्या १४ ऑगस्ट २०१२ च्या पत्रान्वये आपण ती ८० टक्के रक्कम अगोदर शिक्षकांना द्यावयाची आहे नंतर केंद्र शासनाकडे त्याबाबत ८० टक्के रक्कमेचे अनुदान मिळणेसाठी प्रस्ताव सादर करावयाचा आहे असे स्पष्टपणे कळविले आहे.**

२. "**या संदर्भात मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) व प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांची विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष डॉ. वेदप्रकाश यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा झाली.** सदर चर्चेमध्ये डॉ. वेदप्रकाश यांनी, आयोगाने दिलेली सुट ही संबंधित विद्यापीठानी बिगर नेट-सेट अध्यापकांना नियमीत नेमणुक देते वेळी दिलेल्या सुटीच्या दिनांकापासुन देण्यात आल्याचे नमुद करुन अशा प्रकारे विद्यापीठांनी बिगर नेट-सेट अध्यापकांना नियमीत नेमणुक देते वेळी दिलेल्या सुटीच्या दिनांकापासुन सेवा नियमीत करुन सदर सेवा नियमीतीकरण हे सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरावयाचे असलेल्याचा निर्णय आयोगाने घेतलेला असल्याचा आयोगाच्या दि. १५/०३/२०१२ च्या पत्राचा अन्वयार्थ स्पष्ट केला." असे नमुद करुन "**सदर बाब अशीच स्विकृत करावयाचे ठरले.**" हा २ मे २०१२ रोजीच्या बैठकीत मा. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झालेला महाराष्ट्र शासनाचा निर्णय आपण या महासंघाला दिनांक ९ मे २०१२ रोजीच्या पत्रान्वये कळविला होता हे आपणास आठवत असेलच.

३. तथापि दुर्देवाने दिलेल्या कुठल्याही आश्वासनाची पूर्तता आपल्या मंत्रालयाकडून झालेली नाही. संपूर्ण शिक्षक समूदाय आपल्या मंत्रालयाच्या संयम ठेवा व वाट पहा ह्या वृत्तीने त्रस्त झाला असून त्यांच्या मनातील प्रचंड असंतोष व क्षोभ वर्णनापलीकडचा आहे. यास्तव महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने दि. १६ सप्टेंबर २०१२ रोजी मुंबई येथे झालेल्या कार्यकारिणीच्या बैठकीत या संदर्भात एक ठराव संमत केला आहे सदर प्रस्तावाची एक प्रत आपल्या माहितीसाठी पत्रासोबत जोडीत आहोत. त्यानुसार प्राध्यापक महासंघाने दिनांक १० ऑक्टोबर २०१२ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे राज्यव्यापी धरणे आंदोलन आयोजित केले आहे. त्याच दिवशी या ठरावाची प्रत औपचारीकपणे आपणास प्रत्यक्ष सुपूर्त केली जाईल. **यास्तव दिनांक १० ऑक्टोबर २०१२ रोजी आपण महाराष्ट्र प्राध्यापक महासंघास चर्चेसाठी बैठकीची वेळ द्यावी ही विनंती.**

आपले विश्वासू,

**(प्रा. शिवाजीराव पाटील)** — *अध्यक्ष*

**(डॉ. तापती मुखोपाध्याय)** — *सचिव*

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)**

मा. मुख्यमंत्री, मा. उच्च शिक्षणमंत्री, मा. समाजकल्याण मंत्री व मा. राज्यमंत्री उच्च व तंत्रशिक्षण विभाग, यांच्या कार्यालयामध्ये दिनांक २४ सप्टेंबर २०१२ रोजी संघटनेचे अध्यक्ष व सचिव यांनी उपरोक्त निवेदन स्वतंत्रपणे सुपूर्त केले आहे.

*__एक म्हणजे__ नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत वारंवार दिलेल्या लेखी अभिवचनांचे पालन न होणे, __दुसरे म्हणजे__ नविन वेतनश्रेणीमुळे नेट-सेट मुक्त शिक्षकांसह सर्व शिक्षकांच्या बाबतीत १ जानेवारी २००६ पासून पुढच्या चार-पाच वर्षासाठी येणाऱ्या थकितबाकीचा ८० टक्के अंशभाग सोसायला केंद्र शासन तयार आहे असा शासननिर्णय केंद्राने काढला असतांना याबाबत आकसपूर्ण भूमिका घेतलेल्या उच्च शिक्षण विभागातील नोकरशाहीने कोणतीही कारवाई न करणे, आणि __तिसरे म्हणजे__ प्रत्यक्ष निर्गमित झालेल्या शासननिर्णयाची अंमलबजावणी न होणे, तसेच या स्तरावरील शिक्षकांच्या प्रलंबीत असलेल्या विविध समस्या व प्रश्नांविषयी नोकरशाहीच्या आकसपूर्ण धोरणाविरुद्ध तीव्र संघर्ष करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात येत आहे.*

*(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या रविवार, दिनांक १६ सप्टेंबर २०१२ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेल्या ठरावातील परिच्छेद १० पहा)*

मार्च १९९४ या दोन महिन्याच्या (धड दोन सुद्धा नव्हे) काळातील उच्च शिक्षण विभागाची ही तीन पत्रे पाहिली म्हणजे या साऱ्या प्रकाराची एकंदर हास्यास्पदता लक्षात येते. विशेष असे की पत्रापत्रीचा हा सारा प्रकार केंद्र शासनाच्या, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या, परिनियमांच्या व समझोत्याच्या विरोधात होता.

**६.७** संघटनेने वारंवार निवेदने देवून सुद्धा हा पोरकटपणा उच्च शिक्षण विभागातील नोकरशाहीच्या लक्षात यायला २-३ वर्षाचा काळ लागला व शेवटी शासनाने जरूर तो विचार करून नेटसेट बाबतचा २२ डिसेंबर १९९५ चा शासन निर्णय निर्गमित केला. नेटसेट बाबत शासनाची भूमिका विद्यापीठ अनुदान आयोगाच्या, तसेच केंद्र शासनाच्या धोरणाशी व महाराष्ट्र शासनाशी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा जो समझोता झाला त्याच्याशी पूर्णपणे विसंगत होती याचा कबुलीजबाबच या २२ डिसेंबर १९९५ च्या शासन निर्णयाने दिलेला आपल्याला दिसून येईल. "**नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण करण्याची दिनांक ३१.३.१९९६ ची मुदत या आदेशाव्दारे काढून टाकण्यात येत आहे.**" हा शासन निर्णयाच्या परिच्छेद ७ (अ) मधील उल्लेख म्हणजे एमफुक्टोने याबाबत घेतलेली भूमिका किती बिनचूक होती याचा पुरावाच म्हणता येईल.

**६.८** नसलेल्या अटी घुसाडतांना "नेट सेट परीक्षा ३१ मार्च १९९४ पर्यंत उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश **पहिल्या सोमवारी** काढावयाचा, "३१ मार्च १९९५ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश **दुसऱ्या सोमवारी** काढावयाचा व "३१ मार्च १९९६ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश **तिसऱ्या सोमवारी** काढावयाचा **या स्वतःवर लादून घेतलेल्या प्रक्षिप्तपणाच्या विक्षिप्त प्रकारातून उच्च शिक्षण विभागाची** २२ डिसेंबर १९९५ च्या शासननिर्णयाने मुक्तता झाली हे खरे असले तरी अनेक बेकायदेशीर अटी नव्याने लादण्याचा नवा प्रयत्न, नव्या जोमाने नोकरशाहीने अमलात आणला असे दिसून येते.

**६.९** "**नेटसेट परीक्षा उत्तीर्ण नाही या कारणास्तव अशा अधिव्याख्यात्यांना सेवेतून कमी करण्यात येवू नये**" अशी तरतुद करतांनाच "**अशा सर्व अधिव्याख्यात्यांना नेटसेट परीक्षा उत्तीर्ण करणे अनिवार्य राहील**" अशीहि तरतुद २२ डिसेंबर १९९५ च्या शासननिर्णयात (यापुढे उल्लेख १९९५ चा शासननिर्णय असा) टाकलेली होती. केंद्र शासनाच्या २२ जुलै १९८८ च्या सूचनांमध्ये व महाराष्ट्र शासनाच्या २७ फेब्रुवारी १९८९ च्या शासन निर्णयामध्ये 'शिक्षक' व 'उमेदवार' असा स्पष्ट फरक करण्यात आलेला आहे. रिफ्रेशर कोर्सेस शिक्षकांसाठी असून राष्ट्रीय पात्रता परीक्षा ही उमेदवारांसाठी आहे. उमेदवारांसाठी असलेल्या अटी शिक्षकांवर लादणे सर्वस्वी गैर आहे. ही गोष्ट या महासंघाने वारंवार लक्षात आणून दिली. **विधीवतरित्या सेवेत भरती झालेल्या अधिव्याख्यात्यांवर मुळ योजनेत नसलेली ही अट लादण्याचा प्रयत्न प्रक्षिप्तपणा व विक्षिप्तपणा या दोनही गुणांचे प्रतिनिधीत्व करतो ही गोष्ट महासंघाने त्यावेळीच शासनाच्या लक्षात आणून दिली होती.**

**६.१०** विधीवतरित्या सेवेत भरती झालेल्या व भरती होतांना विधिमय पात्रता धारक अशा या शेकडो शिक्षकांच्या सेवा २ वर्षाच्या सेवेनंतर कायदा व परिनियमातील तरतुदीप्रमाणे 'कन्फर्म' झालेल्या होत्या. त्यांच्याबाबतीत १९९५ च्या शासन निर्णयात "**त्यांच्या सेवा तदर्थ (Ad-hoc) समजण्यात याव्या**" अशी एक बेकायदेशीर तरतुद टाकण्यात आली होती. ती तरतुद स्पष्टपणे बेकायदेशीरपणाची असल्यामुळे पुढे ती शासनाला मागे घ्यावी लागली.

**६.११** नियमित भरती झालेल्या शिक्षकांच्याबाबतीत सबंध भारतभरात कुठेही घडला नाही असा एक प्रकार महाराष्ट्रात घडला. १९९५ च्या शासननिर्णयात या सर्व शिक्षकांना "**यापुढे वार्षिक वेतनवाढ देण्यात येवू नये.**" अशी अत्यंत विक्षिप्तपणाची तरतुद टाकण्यात आली होती. ती पूर्णपणे बेकायदेशीर असल्यामुळे पुढे शासनाला ती अट मागे घ्यावी लागली.

**६.१२** यांची **सेवा स्थाननिश्चितीसाठी न धरण्याची अट** याच कुप्रसिद्ध शासननिर्णयात अंतर्भूत असून ती अटसुद्धा बेकायदेशीर असल्याचे विद्यापीठ अनुदान आयोगाने शासनाला कळविले असून त्यांची सेवा नेमणूकीच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनासाठी धरली जावी असे कळविले आहे.

**६.१३** यावेळी महाराष्ट्रात काय स्थिती होती याबाबतची माहिती नागपूर विद्यापीठाच्या कुलसचिवांनी विद्यापीठ अनुदान आयोगाला दिनांक १७ डिसेंबर २००२ च्या पत्रान्वये कळविली होती. या पत्राची प्रत शासनाला सुद्धा पाठविण्यात आली होती. या पत्रातील परिच्छेद ६ (फ) पुढील प्रमाणे :-

"(f) Instead of firmly introducing NET/SET as a compulsory qualification at recruitment level by the competent legal instrument such as Standard Code, the State Govt. was constantly introducing NET/SET qualification by informal instruments and was simultaneously enjoying the benefits of not introducing it. Since NET/SET was not inducted as a compulsory qualification at the recruitment level by legal instrument , hundreds of candidates without NET/SET, were recruited from 1991 till the cut-off date i.e. 28.12.1999 in this university area. Advertisements were approved, Selections were made, approvals were granted by the university and; because it was the perfectly lawful recruitment in the teaching cadre, 100% salary grants were paid by the State Govt. in respect of such lawfully recruited teachers year after years and continued to be so paid even to-day."

अशीच माहिती अमरावती विद्यापीठाच्या मा. कुलगुरुंनी दिनांक

१० डिसेंबर २००२ च्या पत्रान्वये विद्यापीठ अनुदान आयोगाला व शासनाला कळविली होती. सर्व विद्यापीठाच्या कुलगुरूंनी ही बाब विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लक्षात आणून दिली होती. खुद्द महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने दिनांक १० डिसेंबर २००२ च्या पत्राने ही गोष्ट विद्यापीठ अनुदान आयोगाच्या व शासनाच्या लक्षात आणून दिली होती.

**६.१४** राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांनी सतत ५ दिवस सह्याद्रीवर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी चर्चा करुन केंद्र शासनाच्या व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनांप्रमाणेच महाराष्ट्रात अम्मलबजावणी करण्यात येईल असे समझोतापत्रक १९८९ मध्ये लेखी स्वरूपात केले. त्यानंतर राज्याच्या मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी केंद्र शासनाच्या व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनांप्रमाणेच महाराष्ट्रात अम्मल केला जाईल असे १९९९ मध्ये सभागृहात सांगितले व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी तसे लिखित मतैक्य पत्र स्वाक्षरीत केले. **असे असतांना केंद्र शासनाने व विद्यापीठ अनुदान आयोगाने न लावलेल्या अटी (तदर्थ नेमणुका, बढती न देणे, वेतनवाढ न देणे) महाराष्ट्रातील "डेस्क ऑफीसर" वर्षानुवर्षे लादतात ही मोठ्या अचंब्याची गोष्ट आहे.** भ्रष्टाचारी हेतू मनात ठेवून उथळपणे व थिल्लरपणे काम करणाऱ्या नोकरशाहीच्या या वर्तनामुळे मंत्र्यांना केवढ्या नामुष्कीला तोंड द्यावे लागते, यासाठी महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड ११४, क्रमांक ९ पृष्ठ ६१ वर नोंदविण्यात आलेले गुरुवार, दिनांक २६ मार्च १९९८ रोजी झालेल्या चर्चेचे अधिकृत प्रतिवेदन पाहिले तर आपल्याला असे दिसून येईल की, **२२ जुलै १९८८ च्या पत्रान्वये विद्यापीठ अनुदान आयोगाने ज्या २९ अटी टाकलेल्या आहेत त्यातील एकाही अटीला आमचा विरोध नाही पण या चार अटी त्यात नाहीत असे काही सभासदांनी विधानपरिषदेत सांगीतले असतांना गुणवत्ता वाढीसाठी या अटी लादणाऱ्या तत्कालीन उच्च शिक्षणमंत्र्यांना खाली मान घालून "केंद्राच्या अटी आता माझ्याजवळ नाहीत. मला त्या सांगता येणार नाही" असे उत्तर द्यावे लागले होते.**

**६.१५.** केंद्र शासनाप्रमाणे व युजीसी प्रमाणे करू असे ठरल्यानंतर सुद्धा शिक्षकांच्या जीवनाचे वाटोळे करणाऱ्या अटी आपण लादतो. त्या अटी केंद्राकडून आलेल्या आहेत की नाहीत याची माहितीसुद्धा अधिकारी मंत्रिमहोदयांना देत नाहीत व सभागृहात मंत्र्यांची फजिती होत असतांना गॅलरीत बसलेले अधिकारी गालातल्या गालात हसत असतात. या फजितवड्याचे दर्शन घडविणारी चर्चा गुरुवार, दिनांक २६ मार्च १९९८ रोजी झाली. ती महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड ११४, क्रमांक ९ पृष्ठ ६२ वर नोंदविण्यात आलेली असून त्यातील थोडासा भाग शब्दशः पुढील प्रमाणे :-

"**प्रा.बी.टी.देशमुख :** युजीसीने स्पष्ट सूचना दिल्या आहेत. त्यांच्या बरोबर कन्सल्ट करण्याचा प्रश्नच नाही. त्यांनी जे सांगितले नाही ते तुम्ही केले, आता त्यांना कशासाठी कन्सल्ट करता? विथड्रा युवर लोकल प्रॉडक्शन फर्स्ट. माझ्याजवळ त्या अटी आहेत. आमचे हे दुर्दैव की त्या तुमच्या जवळ नाहीत. तर मग ही लक्षवेधी सूचना राखून ठेवा.

**उपसभापती :** युजीसीच्या स्कीममध्ये नाही ते त्यांनी मान्य केले."

"**श्री.सुरेश पाटील :** सभापती महोदय, ज्या तीन अटी सांगितल्या आहेत त्या अटींचा आधार घेवून मंत्रिमहोदय वारंवार सांगत आहेत त्या काय आहेत त्या सांगाव्यात अन्यथा ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

**उपसभापती :** त्या अटी त्यांच्याजवळ नाहीत म्हणून ते सांगू शकत नाहीत.

**श्री. अरुण मेहता :** तर मग ही लक्षवेधी सूचना राखून ठेवा.

(गोंधळ)

**श्री. अरूण मेहता :** सभापती महोदय when the minister concerned has incomplete information about the issue तेव्हा लक्षवेधी सूचना राखुन ठेवली पाहीजे दुसरा काय पर्याय आहे.

**उपसभापती :** याला दुसरा काहीच पर्याय नाही."

त्यादिवशी लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात आली. पुढे या चार अटीपैकी ३ अटी शासनाला रद्द कराव्या लागल्या. चौथी अट विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनांच्या विरुद्ध आहे हे पुढे खुद्द विद्यापीठ अनुदान आयोगानेच कळविले.

**७.** "उच्च शिक्षण विभागाच्या वतीने डझनाच्यावर लिखित स्वरुपाच्या मुदतबंद आश्वासनांची व अभिवचनांची पूर्तता होत नाही ही गोष्ट निश्चितपणे त्या खात्याचा लौकिक वाढविणारी नाही." असा उल्लेख वर परिच्छेद ३ मध्ये आलेला आहे. याबाबतची तपशिलवार माहिती पुढील उपपरिच्छेदातून दिलेली आहे.

**७.१** "यामध्ये आज सेवेत असलेले जे शिक्षक आहेत त्यांना मुदत वाढवून देण्याचा प्रश्न नाही. त्यांच्या नेमणूकपत्रामध्ये तसे नाही, त्यांना कधी तसे सांगितले नाही, जाहिरातीमध्ये तसे जाहीर केले नाही.... आज सेवेत असलेल्या लोकांना लागू होत नाही. कारण त्यांचे सिलेक्शन लॉफूल आहे, ते कंडीशनल नाही. लॉ-फुली कॉन्स्टीट्युटेड सिलेक्शन

***महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक १६ सप्टेंबर २०१२ रोजी मुबई येथे झालेल्या बैठकीत सम्मत झालेला आंदोलनाचा ठराव***

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक १६ सप्टेंबर २०१२ रोजी मुंबई येथे झालेल्या बैठकीत सम्मत झालेल्या आंदोलनाच्या ठरावानुसार नागपूर व अमरावती येथील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या मेळाव्याचा दिवस, दिनांक वेळ व स्थळ खालील तक्त्यात दिल्या प्रमाणे आहे. सर्व प्राध्यापकांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.- **डॉ. अनिल ढगे, सचिव, नुटा**

**तक्ता**

## *नागपूर व अमरावती येथे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या मेळाव्यांचे आयोजन*

| | | | |
|---|---|---|---|
| राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. | बीझनेस मॅनेजमेंट सभागृह, सी.पी. अँन्ड बेरार कॉलेज, सी.पी. क्लब समोर, रवी नगर, नागपूर | रविवार, दिनांक २८ ऑक्टोबर, २०१२ | दुपारी ३.०० वाजता |
| संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती. | केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती | शनिवार, दिनांक २७ ऑक्टोबर, २०१२ | दुपारी ४.०० वाजता |

कमिटीच्यामार्फत चान्सलरांच्या स्टॅट्यूटप्रमाणे ते रिक्रुट झालेले आहेत. त्यांना कॉम्पिटन्ट ॲथारिटीची मान्यता आहे. त्यांना ते लागू होत नाही. **सेवेत असलेल्या लोकांना ते लागू करण्याचे आपण या २-४ महिन्यात आदेश काढले ते आपण केंव्हा मागे घेणार असा प्रश्न आहे. याचे माननीय मंत्री महोदय उत्तर देतील काय?"** एवढी माहिती विधानपरिषद सभागृहामध्ये ऐकून घेतल्यानंतर विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी मा. उच्च शिक्षणमंत्री उठत असतांना त्यांना थांबवून राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांनी **"यापूर्वी शिक्षक झालेले आहेत आणि त्यांना याची आवश्यकता नाही असे सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख सांगत आहेत. जर ती वस्तुस्थिती असेल तर त्यासंबंधीचा अपवाद करण्याची तयारी राहील."** असे स्पष्ट आश्वासन गुरुवार, दिनांक १७ मार्च १९९४ रोजी सभागृहामध्ये दिले. याबाबत वस्तुस्थिती काय आहे हे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पत्राने आता स्पष्ट झाले आहे. यापूर्वीची सुद्धा विद्यापीठ अनुदान आयोगाची तशी अनेक परिपत्रके आहेत.

**७.२ दिनांक ३० मार्च २००१ रोजी विधानपरिषदेत** "पण तदर्थ स्वरुपाच्या नेमणूका देणे, वार्षिक वेतनवाढ देण्यात न येणे, त्यांची सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विचारात न घेणे, सेवा ज्येष्ठता न देणे इ. अटी यु.जी.सी. ने व केंद्र शासनाने घातलेल्या नाहीत .... **तेव्हा या वरील अटी रद्द करणार आहात काय ते सांगा."** या प्रश्नाला तत्कालीन मा.उच्च शिक्षणमंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांनी **एका शब्दात ठामपणे "होय." असे उत्तर दिले** *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही, अधिकृत प्रतिवेदन खंड १२५, क्रमांक १४, पृष्ठ ११)* व तीन महिन्यामध्ये निर्णय घेऊ असेही स्पष्टपणे सांगितले होते. त्याप्रमाणे त्यांनी शासननिर्णय निर्गमित केला पण तत्कालीन उच्च शिक्षणमंत्र्यांनी त्यापैकी ३ अटींचे दफन केले पण वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीबाबत नोकरशाहीने त्यांच्यावर मात केली. 'त्या' अटीचे दफन त्यांना करता आले नाही. त्यांनी दिलेले "होय" हे आश्वासन आजही अम्मलबजावणी न झाल्याच्या अवस्थेत आहे.

**७.३** राज्यामध्ये १९९१ सालापासून ते १९९९ सालापर्यंतच्या मधल्या काळात जे शिक्षक निरनिराळ्या विद्यापीठात नोकरीस लागलेले आहेत ज्यांनी नेट-सेटची अर्हता धारण केलेली नाही **अशा १० हजार शिक्षकांच्या भवितव्याचा हा प्रश्न आहे आणि या राज्यातील या दहा हजार शिक्षकांच्या भवितव्याचा प्रश्न सहानुभूतीने सोडविण्याच्या दृष्टीने राज्य सरकार निश्चितपणे विचार करीत आहे. मी माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की या संदर्भातील निर्णय राज्य सरकार १५ दिवसामध्ये घेईल."** असे उच्च शिक्षण मंत्र्यांनी आश्वासन दिले. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही, शुक्रवार, दिनांक ३ ऑगस्ट २००१ - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड १२५, क्रमांक १५ पृष्ठ १४१)*

**७.४** "सभापती महोदय,... अधिव्याख्यात्यांना नेट सेट ची परीक्षा १९९१ ला कम्पलसरी करण्यात आली होती. परंतु लीगल इन्स्ट्रुमेन्टच्या माध्यमातून किंवा **स्टॅट्युटमध्ये** किंवा व्हाईस चॅन्सेलरच्या **डायरेक्शन्समध्ये** किंवा गव्हर्नमेन्टच्या **कोड मध्ये** यासंबंधीचा उल्लेख न केल्यामुळे, नेट सेटची परीक्षा कायद्याने लागू करता आली नाही" असे मा. विद्यमान उच्च शिक्षणमंत्र्यांनी दिनांक १७ डिसेंबर २००८ रोजी विधानपरिषद सभागृहात सांगितले.

## महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक १६ सप्टेंबर २०१२ रोजी झालेल्या बैठकीत सम्मत झालेला आंदोलनाचा ठराव

# *जिल्हास्तरीय मेळाव्यांचे आयोजन*

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक १६ सप्टेंबर २०१२ रोजी झालेल्या बैठकीत सम्मत झालेल्या आंदोलनाच्या ठरावानुसार स्तंभ २ मध्ये दर्शविलेल्या जिल्ह्यातील शिक्षकांचा मेळावा स्तंभ तीनमध्ये दर्शविलेल्या दिवशी व दिनांकाला, स्तंभ ४ मध्ये दर्शविलेल्या वेळी व स्तंभ ५ मध्ये दर्शविलेल्या स्थळी होईल. या सर्व जिल्हा मेळाव्यांना विद्यापीठस्तरीय संघटनेचे पदाधिकारी व नेते संबोधित करतील. खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे जिल्हास्तरीय मेळाव्यांचे आयोजन केलेले आहे. सर्व प्राध्यापकांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.- **डॉ. अनिल ढगे, सचिव, नुटा**

**तक्ता**

| अ.नं. व जिल्ह्याचे नांव | मेळाव्याचा दिवस व दिनांक | मेळाव्याची वेळ | मेळाव्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ २ | ३ | ४ | ५ |
| १. वाशिम | शनिवार, ०३.११.२०१२ | दुपारी ४.०० वा. | आर.अे. महाविद्यालय, वाशिम |
| २. यवतमाळ | शनिवार, २४.११.२०१२ | दुपारी ४.०० वा. | बाबाजी दाते कला व वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ. |
| ३. अकोला | रविवार, २५.११.२०१२ | सकाळी १०.०० वा. | आर.एल.टी.सायन्स कॉलेज, अकोला. |
| ४. बुलढाणा | रविवार, २५.११.२०१२ | दुपारी ४.०० वा. | जिजामाता महाविद्यालय, बुलढाणा |
| ५. चंद्रपूर व गडचिरोली | बुधवार, २८.११.२०१२ | सकाळी ११.०० वा. | जनता महाविद्यालय, चंद्रपूर. |
| ६. वर्धा | शनिवार, ०१.१२.२०१२ | दुपारी ४.०० वा. | यशवंत महाविद्यालय, वर्धा. |
| ७. भंडारा | रविवार, ०२.१२.२०१२ | सकाळी १०.३० वा. | जे.एम. पटेल महाविद्यालय, भंडारा |
| ८. गोंदिया | रविवार, ०२.१२.२०१२ | दुपारी ३.३० वा. | एन.एम.डी.कॉलेज गोंदिया |

**७.५** दिनांक ३ ऑगस्ट २००१ रोजी ही चूक झालेली आहे ही गोष्ट तत्कालीन मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी विधानपरिषदेत तत्पूर्वीच पुढील शब्दात मान्य केली होती. :- "सभापती महोदय, ही बाब खरी आहे की, १९९१ साली यु.जी.सी.ने रेग्युलेशन्स राज्य सरकारला पाठविले होते. त्यानंतर राज्यसरकारने हे रेग्युलेशन्स विद्यापीठांना पाठवत असतांना ते **असाधारण राजपत्रात** प्रसिध्द करुन पाठवावयास पाहिजे होते. तसे करण्यात आले असते तर ते लीगल इन्स्ट्रुमेन्ट ठरले असते. **परंतु राज्य सरकारकडून त्या वेळी ही चूक झालेली आहे.** १९९१ मध्ये जी.आर.काढून राज्य सरकारने विद्यापीठांना हे आदेश पाठविले होते. राज्य सरकारचा हा जी.आर.जरी असला तरी लीगल इन्स्ट्रुमेन्ट नसल्यामुळे विद्यापीठांनी आपल्या स्टॅट्युटसमध्ये बदल केलेले नसतील."

**७.६** मा. विद्यमान उच्च शिक्षण मंत्र्यांनी सांगितले "तीन महिन्यात या सगळ्या प्रश्नांना पूर्णविराम दिला जाईल." **२४ डिसेंबर २००८ च्या पूर्वी चूक दुरुस्त करणारा शासननिर्णय काढतो.** असेही त्यांनी सांगितले. मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी सभागृहात १७ डिसेंबर २००८ रोजी शासनाच्या वतीने पुढील प्रमाणे ठाम आश्वासने दिलीत. :-

"सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी जे तीन प्रश्न विचारलेले आहे त्या बाबत मी शासनाच्या वतीने सांगू इच्छितो की,

(१) **या सदंर्भात एक जी.आर. काढणे आवश्यक आहे** तेव्हा या अधिवेशनाचा कालावधी संपण्याच्या अगोदर हा जी.आर. काढण्यात येईल, जर २४ तारखेला अधिवेशन संपणार असेल तर त्या अगोदर जी. आर. काढण्यात येईल....

(२) **तसेच** हे काम एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावे. अशी सूचना विद्यापीठाला देण्यात येईल." पुढे त्यांनी असेही सांगितले की, **"हे करिअर ॲडव्हान्समेंट स्कीमच्या संदर्भात हे कॅसचे काम पूर्ण करावयाचे आहे त्यासाठी देखील कॅम्प्स घेऊन येत्या दोन महिन्यात पूर्ण करावयाचे आहे."**

(३) अशा प्रकारे हे एकूण सर्वच काम म्हणजे नियमित करण्याचे काम एक महिन्यात आणि त्यापुढे कॅसचे काम दोन महिन्यात **असे तीन महिन्यात पूर्ण करून या सगळ्या प्रश्नांना पूर्णविराम दिला जाईल."**

**७.७ महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे प्रतिनिधी व मा. मुख्य सचिव, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण व संचालक, उच्च शिक्षण यांची मा. मंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण) श्री. राजेशजी टोपे यांचे समवेत दिनांक २६ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तातील परिच्छेद ५ पुढील प्रमाणे आहे.** :-

"विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी केलेल्या तरतूदी व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी वेगवेगळ्या याचिकांमध्ये (मुख्यतः याचिका क्र. : ५०२२/२००१, क्र. ५३७५/२००१, क्र. ४२६६/२००६) वेळोवेळी पारित केलेल्या आदेशानुसार, **नेट/सेट अर्हतेमधून सूट देण्याचे व नियमित सेवा कधीपासून ग्राह्य धरण्यात यावी, याबाबतचे सर्वतोपरी अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगास आहेत. याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय अंतिम राहील**"

**७.८** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांना महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे दिनांक २४ जुलै, २००९ रोजी जे पत्र (क्र. एनजीसी २००८/२४३/२००८/विशि-१) पाठविण्यात आले त्यात स्पष्टपणे पुढील उल्लेख आहे. :-

"(i) राज्य शासन विद्यापीठ अनुदान आयोगाला व केंद्र शासनाला प्रलंबित प्रकरणे त्वरित निकाली काढण्यासाठी विनंती करील.

**(ii) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सूट मिळाल्याचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३० दिवसाच्या आंत ती प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शिबीर आयोजित करुन कार्यवाही पूर्ण करण्यात येईल."**

**७.९** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे दिनांक ३१ जुलै, २००९ रोजी जे पत्र (क्र. एनजीसी (२००८/२४३/०८)/विशि-१) पाठविण्यात आले त्यात पुढीलप्रमाणे स्पष्ट उल्लेख आहे. :-

"**(i)** राज्य शासन विद्यापीठ अनुदान आयोगाला व केंद्र शासनाला प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकाली काढण्यासाठी विनंती करील. आवश्यकता पडल्यास याचा पाठपुरावा करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे जबाबदारी देऊन सदर प्रलंबीत कामे त्वरीत पूर्ण करुन घेण्यात येईल.

**(ii) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सुट मिळाल्याचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३० दिवसांच्या आंत ती प्रकरणे**

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO) Affiliated to the AIFUCTO**
**Vidyapeeth Vidyarthi Bhavan, 'B' Road, Churchgate, Mumbai – 400 020**

एक म्हणजे नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत वारंवार दिलेल्या लेखी अभिवचनांचे पालन न होणे, दुसरे म्हणजे नविन वेतनश्रेणीमुळे नेट-सेट मुक्त शिक्षकांसह सर्व शिक्षकांच्या बाबतीत १ जानेवारी २००६ पासून पुढच्या चार-पाच वर्षासाठी येणाऱ्या थकितबाकीचा ८० टक्के अंशभाग सोसायला केंद्र शासन तयार आहे असा शासननिर्णय केंद्राने काढला असतांना याबाबत आकसपूर्ण भूमिका घेतलेल्या उच्च शिक्षण विभागातील नोकरशाहीने कोणतीही कारवाई न करणे, आणि तिसरे म्हणजे प्रत्यक्ष निर्गमित झालेल्या शासननिर्णयाची अंमलबजावणी न होणे, तसेच या स्तरावरील शिक्षकांच्या प्रलंबीत असलेल्या विविध समस्या व प्रश्नांविषयी नोकरशाहीच्या आकसपूर्ण धोरणाविरुद्ध तीव्र संघर्ष करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात येत आहे. आज रविवार, दिनांक १६ सप्टेंबर २०१२ रोजी झालेल्या महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या (MFUCTO) कार्यकारी मंडळाच्या बैठकीत व्यक्त करण्यात आला असून आंदोलनाच्या ठरावाप्रमाणे सुरुवातीला

# राज्यस्तरीय धरणे आंदोलन

बुधवार, दिनांक १० ऑक्टोबर २०१२

**आझाद मैदान, मुंबई**

वेळ सकाळी ११ ते २

यावेळेत आयोजित केलेले आहे.

**प्रा. शिवाजीराव पाटील** *(अध्यक्ष)*

**डॉ. ताप्ती मुखोपाध्याय** *(सचिव)*

***उच्च शिक्षण विभागातील नोकरशाहीने सन १९९१ ते २००० या काळातील नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत एकामागून एक जवळ जवळ डझनभर बेकायदेशीर आदेश काढलेत. हे आदेश संपूर्णपणे बेकायदेशीर असल्यामुळे त्यातील प्रत्येक आदेश अत्यंत नामुष्की होवून शासनाला परत घ्यावा लागला.***

*(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या रविवार, दिनांक १६ सप्टेंबर २०१२ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेल्या ठरावातील परिच्छेद २ पहा)*

**निकाली काढण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शिबीर आयोजित करुन कार्यवाही पूर्ण करण्यात येईल."**

**७.१०** विद्यापीठ अनुदान आयोगाने, आयोगाच्या दिनांक ८ जुलै २०११ रोजी झालेल्या ४७९ व्या बैठकीत याबाबत विचार करुन पुढील प्रमाणे निर्णय घेतला. :-

"The Commission **deliberated** on the issue regarding appointment of various teachers in the State of Maharashtra from September 19,1991 until April 3,2000 and resolved that all such appointments made on regular basis by various universities in the state of Maharashtra where the **university has granted exemption** to teachers from the requirement of NET in terms of the UGC Regulations, 1991 and subsequent Notification dated 24.12.1998 and where the **representation** has been forwarded to Commission seeking further approval in relation to such regular appointments made during the said period w.e.f. September 19,1991 till April 3, 2000 **is approved.** It further resolved that a communication in this regard be sent to the universities concerned and the state of Maharashtra" दिनांक १६ ऑगस्ट २०११ च्या पत्रान्वये ही गोष्ट उच्च शिक्षण विभागाच्या मा. प्रधान सचिवांना कळविण्यात आली.

**७.११** पुन्हा विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक २६ ऑगस्ट २०११ रोजी पत्र पाठवून पूर्व परिच्छेदात नमुद केलेला निर्णय तर कळविलाच व त्याचबरोबर आणखी असेही कळविले की, "As may be seen from the above decision of the commission, the commission has taken the said decision in respect of all such appointments made on regular basis by various universities during the period from September 19, 1991 to April 3, 2000. Therefore the services of such teachers **for all purposes should be counted from the date of their regular appointment.**"

**७.१२** महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागाच्या सचिवांनी दि. २ डिसेंबर २०११ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सचिवांना नेट-सेट ग्रस्त प्राध्यापकांच्या बाबत एक पत्र देऊन यु.जी.सी. ने महाराष्ट्रातील नेट-सेट ग्रस्त प्राध्यापकांबद्दल कायदे व नियमांना धरुन घेतलेल्या सकारात्मक आणि धोरणात्मक निर्णयाविरुद्ध आगपाखड केली होती. उच्च शिक्षण विभागाच्या सचिवांनी पाठविलेल्या पत्रात "Therefore it is very absurd on the part of UGC..." असा उल्लेख करुन आपल्या मर्यादांचे उल्लघन केले होते. "absurd" या शब्दाचा शब्दकोषात असलेला मराठीतील अर्थ "मुर्खपणा, असमंजस, अयोग्य, हास्यास्पद" असा होतो. यु.जी.सी.ला "मुर्ख, असमंजस, हास्यास्पद" ठरविणाऱ्या व ते देखील लेखी स्वरुपात कळविणाऱ्या महाराष्ट्राच्या उच्चशिक्षण विभागाच्या सचिवांच्या ह्या पत्राला विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक १५ मार्च २०१२ रोजी जे उत्तर (By Speed Post : No. F-13/2011(PS) ) दिले, त्या पत्राचा विषयच "**Subject :** Unwarranted request from Principal Secretary, Higher Education, Government of Maharashtra to the UGC for reverting the decision on grant of exemption and regularization services of non NET/SET teachers in Maharashtra appointed during 19.09.1991 till 03.04.2000." असा होता व त्यात " With reference to your letter No. Nil dated 13th February, 2012 on the subject cited above, I am directed to inform you that the actual date of effect for grant of exemption to a particular candidates shall be the date of exemption actually granted by the universities to the concerned candidate appointed on Regular Basis" असे स्पष्टपणे नमुद केलेले होते.

**७.१३** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांना दिनांक ९ मे २०१२ रोजी उच्च शिक्षण विभागाने "एमफुक्टो संघटनेच्या विविध मागण्यांबाबत मा. मुख्यमंत्री यांच्याकडे झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त." या विषयावर एक पत्र पाठविले होते. त्या पत्रात "मा. मुख्यमंत्री, मा. मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण), मा. राज्यमंत्री (उ.व तंशी) व संघटनेचे पदाधिकारी यांच्या मध्ये सविस्तर चर्चा होवुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेः-" असे नमुद करुन सोबत २ मे २०१२ रोजीच्या बैठकीचे कार्यवृत्त जोडलेले होते.

**७.१४** या कार्यवृत्तातील परिच्छेद २ हा नेट-सेटबाबत असून त्याचा पूर्वार्ध व उत्तरार्ध शब्दशः पुढील प्रमाणे आहे. :-

"२. दि. १९ सप्टेंबर, १९९१ ते ३ एप्रिल २००० या कालावधीतील बिगर नेट-सेट अध्यापकाच्या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. १६/०८/२०११, २६/०८/२०११ व दि १५/०३/२०१२ च्या पत्रान्वये दिलेले निर्देश विचारात घेवुन सदर अध्यापकांच्या सेवा नियुक्तीच्या दिनांकापासुन सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्याचे निदेश दिले आहेत. **या संदर्भात मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) व प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांची विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष डॉ. वेदप्रकाश यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा झाली.** सदर चर्चेमध्ये डॉ. वेदप्रकाश यांनी, आयोगाने दिलेली सुट हि संबंधित विद्यापीठानी बिगर नेट-सेट अध्यापकांना नियमीत नेमणुक देते वेळी दिलेल्या सुटीच्या दिनांकापासुन देण्यात आल्याचे नमुद करुन अशा प्रकारे विद्यापीठांनी बिगर नेट-सेट अध्यापकांना नियमीत नेमणुक देते वेळी दिलेल्या सुटीच्या दिनांकापासुन सेवा नियमीत करुन सदर सेवा नियमीतीकरण हे सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरावयाचे असल्याचा निर्णय आयोगाने घेतलेला असल्याचा आयोगाच्या दि. १५/०३/२०१२ च्या पत्राचा अन्वयार्थ स्पष्ट केला. **सदर बाब अशीच स्विकृत करावयाचे ठरले.**

**तथापि हे मत आयोगाकडुन लेखी सहमतीत करुन घेण्याचे ही बैठकीत ठरले.** त्याप्रमाणे आयोगास तात्काळ पत्र निर्गमित करावे. उपरोक्त कालावधीतील अध्यापकांच्या सेवा आयोगाकडुन वरीलप्रमाणे सहमती प्राप्त होण्याच्या अधिन सर्व प्रयोजनार्थ नियमित नियुक्तीच्या दिनांकापासुन ग्राह्य धरण्याचे ठरले. **याबाबतचा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर उक्त अध्यापकांना दिनांक ११/१२/१९९९ व दि. १२/०८/२००९ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदी विचारात घेवुन त्यांची स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती करण्यात यावी.** "

**७.१५** महाराष्ट्र शासनाच्या या पत्राच्या परिच्छेद २ चे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास मा. मुख्यमंत्र्याच्या उपस्थितीत पुढील गोष्टी निश्चितपणे ठरल्या असे राज्याच्या मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी

***महाराष्ट्राच्या मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी राज्याच्या मुख्यसचिवांच्या उपस्थितीत दिलेल्या लिखित आश्वासनाचे पालन केले जात नाही, त्यांनी राज्याच्या मा.मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत दिलेल्या लिखित शब्दांची अंमलबजावणी केली जात नाही, यामुळे महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला आहे.***

*(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या रविवार, दिनांक १६ सप्टेंबर २०१२ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेल्या ठरावातील परिच्छेद १ पहा)*

महासंघाच्या अध्यक्षांना कळविले. त्या पुढील प्रमाणे :-

(१) दि. १९ सप्टेंबर, १९९१ ते ३ एप्रिल २००० या कालावधीतील बिगर नेट-सेट अध्यापकाच्या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. १६/०८/२०११, २६/०८/२०११ व दि १५/०३/२०१२ च्या पत्रान्वये दिलेले निर्देश विचारात घेवुन सदर अध्यापकांच्या सेवा नियुक्तीच्या दिनांकापासुन सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्याचे निदेश दिले आहेत.

**(२) या संदर्भात मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) व प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांची विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष डॉ. वेदप्रकाश यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा झाली.**

(३) सदर चर्चेमध्ये डॉ. वेदप्रकाश यांनी, आयोगाने दिलेली सुट हि संबंधित विद्यापीठानी बिगर नेट-सेट अध्यापकांना नियमीत नेमणुक देते वेळी दिलेल्या सुटीच्या दिनांकापासुन देण्यात आल्याचे नमुद करुन अशा प्रकारे विद्यापीठांनी बिगर नेट-सेट अध्यापकांना नियमीत नेमणुक देते वेळी दिलेल्या सुटीच्या दिनांकापासुन सेवा नियमीत करुन सदर सेवा नियमीतीकरण हे सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरावयाचे असल्याचा निर्णय आयोगाने घेतलेला असल्याचा आयोगाच्या दि. १५/०३/२०१२ च्या पत्राचा अन्वयार्थ स्पष्ट केला.

(४) **"सदर बाब अशीच स्विकृत करावयाचे ठरले."** असा महाराष्ट्र शासनाचा निर्णय स्पष्टपणे तेथे नमुद आहे.

(५) **तथापि हे मत आयोगाकडुन लेखी सहमतीत करुन घेण्याचेही बैठकीत ठरले.**

(६) त्याप्रमाणे आयोगास तात्काळ पत्र निर्गमित करावे. उपरोक्त कालावधीतील अध्यापकांच्या सेवा आयोगाकडुन वरीलप्रमाणे सहमती प्राप्त होण्याच्या अधिन सर्व प्रयोजनार्थ नियमित नियुक्तीच्या दिनांकापासुन ग्राह्य धरण्याचे ठरले.

**(७) याबाबतचा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर उक्त अध्यापकांना दिनांक ११/१२/१९९९ व दि. १२/०८/२००९ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदी विचारात घेवुन त्यांची स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती करण्यात यावी.**

**७.१६** सारांश काय तर राज्याचे मा. उच्च शिक्षणमंत्री व प्रधान सचिव उच्च शिक्षण हे फोनवरुन विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांशी बोलले त्यावर अनुदान आयोगाच्या अध्यक्षांनी "सदर चर्चेमध्ये डॉ. वेदप्रकाश यांनी, आयोगाने दिलेली सुट हि संबंधित विद्यापीठानी बिगर नेट-सेट अध्यापकांना नियमीत नेमणुक देते वेळी दिलेल्या सुटीच्या दिनांकापासुन देण्यात आल्याचे नमुद करुन अशा प्रकारे विद्यापीठांनी बिगर नेट-सेट अध्यापकांना नियमीत नेमणुक देते वेळी दिलेल्या सुटीच्या दिनांकापासुन सेवा नियमीत करुन सदर सेवा नियमीतीकरण हे सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरावयाचे असल्याचा निर्णय आयोगाने घेतलेला असल्याचा आयोगाच्या दि. १५/०३/२०१२ च्या पत्राचा अन्वयार्थ स्पष्ट केला." असे सांगितले त्यावर सदर बाब अशीच स्विकृत करावयाचे ठरले, असा महाराष्ट्र शासनाचा निर्णय स्पष्टपणे तेथे नमुद आहे. असे मा. मुख्यमंत्र्याच्या उपस्थितीत ठरले पण मा. मुख्यमंत्री असे म्हणाले की "**तथापि हे मत आयोगाकडुन लेखी सहमतीत करुन घ्यावे**" त्याप्रमाणे आयोगाला ७ मे २०१२ रोजी उच्च शिक्षण विभागाने पत्र लिहीले. काही अधिकारी विमानाने दिल्लीला गेले व ताबडतोबच ११ मे २०१२ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाने उत्तर पाठविले त्यात "As may be seen from the above decision of the commission, the commission has taken the said decision in respect of all such appointments made on regular basis by various universities during the period from September 19, 1991 to April 3, 2000. Therefore the services of such teachers **for all purposes should be counted from the date of their regular appointment.**" असे नमुद केले आहे. आता काय शिल्लक राहिले आहे? याबाबत "जून २०१२ अखेरपर्यंत मंत्रिमंडळ स्तरावर निर्णय घेण्यात येईल." असे १५ मे २०१२ च्या महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांना पाठविलेल्या पत्रात शासनाने नमुद केले आहे. सन २०१२ चा जून महिना संपून ४ महिने झाले आहेत हे लक्षात आणून देण्यासाठी महासंघावर आंदोलनाची पाळी यावी हे अत्यंत खेदजनक होय.

**८.** "अनेक शासननिर्णय वित्त विभागाच्या व मंत्रीमंडळाच्या मान्यतेने निर्गमित होऊनसुद्धा त्यांची अंमलबजावणी करावी म्हणून प्राध्यापक महासंघावर वारंवार आंदोलने करण्याची वेळ येते." असा उल्लेख वर परिच्छेद ४ मध्ये आलेला आहे. याबाबतची तपशिलवार माहीती पुढील उपपरिच्छेदातून दिलेली आहे.

**८.१.१** वाढीव महागाई भत्ता शासकीय कर्मचाऱ्यांच्या सोबतच अनुदानित संस्थेतून काम करणाऱ्या सर्व पात्र कर्मचाऱ्यांना एकाच वेळी लागू करावा असे शासनाचे स्पष्ट आदेश असतांना उच्च शिक्षण संचालकांच्या सततच्या गलथान कारभारामुळे गेल्या वर्ष दिड वर्षात दरवेळी विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना तो विलंबाने लागू केला जात आहे. दिनांक ९ एप्रिल २०१२ च्या शासननिर्णयाने ५८ टक्क्यावरुन ६५ टक्के वाढविण्यात आलेला वाढीव महागाई भत्ता १ एप्रिल २०१२ पासून रोखीने देण्यात यावा अशी तरतुद स्पष्टपणे शासननिर्णयात असतांना विद्यापिठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना ही वाढ अनेक महिने लागू करण्यात आली नाही. उच्च शिक्षण संचालकांच्या या गलथानपणाचा तीव्र निषेध करण्यात येत आहे.

**८.१.२** विद्यमान उच्च शिक्षण संचालकांनी कारभार हाती घेण्यापूर्वीच्या ५-१० वर्षात असा विलंब कधीही झाल्याचे आढळून येत नाही. शालेय शिक्षण विभागामध्ये मात्र याबाबतचा गलथानपणाचा कारभार सर्व शिक्षकांसाठी डोकेदुखी होवून बसलेला होता. शेवटी शालेय शिक्षण विभागाने दिनांक २३ डिसेंबर २००८ रोजी एक आदेश (क्रमांक : शिकाना २००८(५७/०८)/माशि-२) काढून सर्व अधिकाऱ्यांना असे कळविले की, "**वित्त विभागामार्फत वाढीव महागाई भत्त्याचे आदेश निर्गमित करतांना शासकीय कर्मचारी व इतर पात्र कर्मचारी असा उल्लेख करतात.** इतर पात्र कर्मचाऱ्यांमध्ये राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा अंतर्भाव होतो.......**महागाई भत्ता लागू करण्यासाठी स्वतंत्रपणे पुन्हा आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता नाही.**" २३ डिसेंबर २००८ च्या उपरोक्त आदेशाच्या परिच्छेद ५ मध्ये शिक्षण संचालकांना असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत की :- "राज्य शासनामार्फत यापुढे देय होणारा वाढीव महागाई भत्ता पात्र शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना देतांना तो नियमित तरतुदीतूनच शासन निर्णयात नमूद केलेल्या महिन्यात देण्याबाबत सर्व संबंधित अधिकाऱ्यांना निदेश देण्यात यावेत." त्याच आदेशात शेवटी परिच्छेद ६ मध्ये स्पष्टपणे गंभीर स्वरुपाच्या कारवाईचा इषारा पुढील शब्दात देण्यात आलेला आहे. :- **"वाढीव महागाई भत्ता विहीत महिन्यात अदा न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध गंभीर स्वरुपाची कार्यवाही करण्यात येईल, याबाबतही**

**सर्व संबंधितांना कृपया जाणिव करुन देण्यात यावी.**"

**८.१.३** उपरोक्त आदेशानंतर शालेय शिक्षण विभागातून ही व्याधी समुळ नष्ट झाली असली तरी उच्च शिक्षण विभागात मात्र गेल्या वर्ष दोन वर्षात या व्याधीने बराच जोर धरलेला आहे असे दिसून येते. ९ एप्रिल २०१२ च्या शासननिर्णयामध्येच स्पष्टपणे "शासन असे आदेश देत आहे की, दिनांक १ जानेवारी, २०१२ पासून सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतनावरील (वेतनबँडमधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ५८ टक्क्यांवरुन ६५ टक्के करण्यात यावा. दि. १ एप्रिल, २०१२ पासून सदर महागाई भत्त्याच्या वाढीची रक्कम रोखीने देण्यात यावी. असे नमुद आहे. त्याच शासननिर्णयात पुढे परिच्छेद ३ मध्ये "महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भातील विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे त्याचप्रकारे यापुढेही लागू राहतील." अशी तरतुद असून परिच्छेद ४ मध्ये "सदर आदेश सुधारित वेतनसंरचनेत वेतन अनुज्ञेय असलेल्या संस्थामधील कर्मचाऱ्यांना योग्य त्या फेरफारासह लागू राहतील." असे आदेशीत केलेले आहे. असे असतांना उच्च शिक्षण संचालकांनी मात्र या शासन निर्णयाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे.

**८.१.४** महागाई भत्त्याची वाढ वित्त विभागाच्या एकाच शासन निर्णयाने उच्च शिक्षण विभागासह सर्व सरकारी कर्मचारी व अनुदानित संस्थामधील सर्व पात्र कर्मचारी यांना लागू होत असतांना, ती आपल्या विभागात दरवेळी अक्षम्य विलंबाने लागू करण्याच्या **उच्च शिक्षण संचालकांच्या कृतिचा तिव्र धिक्कार करण्यात येत असून** अशासकिय अनुदानित अध्यापक महाविद्यालयातील प्राध्यापकांना शासकीय कर्मचाऱ्यांना लागू होईल त्या तारखेपासून वाढीव महागाई भत्ता आम्ही देवू, मात्र अशासकिय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान व विधी महाविद्यालयातील प्राध्यापकांना आम्हाला वाटते तेवढ्या उशिराने आम्ही वाढीव महागाई भत्ता लागू करू. **ही उच्च शिक्षण संचालकांची भेदभावपूर्ण कृती निषेधार्ह आहे.**

**८.१.५** एक म्हणजे शासकीय आदेशांची अवहेलना करुन उच्च शिक्षण विभागात विलंबाने अम्मलबजावणी करण्यास कोण अधिकारी जबाबदार आहेत व दुसरे म्हणजे काही अनुदानित महाविद्यालयात तो वेळेवर लागू करणे व अन्यत्र तो बहू विलंबाने लागू करण्याच्या बाबतीत **कोण अधिकारी जबाबदार आहेत या दोनही बाबींची चौकशी करण्यात येवून जबाबदारी निश्चित झालेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे.**

**८.२.१** संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना बोलाविणे, त्यांच्याशी चर्चा करणे, प्रस्तावित मसुदा त्यांना दाखविणे, आपल्या मसुद्यात काही चुका असतील तर त्याबाबतचे म्हणणे ऐकून घेणे, संघटनेचे पदाधिकारी दाखवितात त्या चुका खरोखरच आपल्या मसुद्यात असतील तर त्याप्रमाणे आपला मसुदा दुरुस्त करणे, **परिणामी बिनचूक असा शासननिर्णय बाहेर पडणे ही प्रक्रियाच आता उच्च शिक्षण विभागात बंद पडलेली आहे.** शिवाय आम्ही करतो ते शंभर टक्के बरोबर आहे हा उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचा अहंकार पदाधिकाऱ्यांशी चर्चा करण्याची जुनी प्रथा चालू ठेवली तर दुखाविला जातो. या अहंकाराच्या पोटीच १९ एप्रिल २०१२ च्या शासननिर्णयाचा जन्म झालेला आहे. या अहंकाराची कमाल मर्यादा अशी की एकाबाबतीत मंत्रिमंडळाच्या व वित्तविभागाच्या सम्मतीने शासननिर्णय सन २००९ मध्येच निर्गमित झालेला आहे. याची आठवण सुद्धा न रहाण्याचा हास्यास्पद प्रकार या शासननिर्णयात अंतर्भुत आहे.

**८.२.२** सन २००९ मध्ये "Revision of pay Scales of teachers and equivalent cadres in Higher Education as per UGC Scheme (6th Pay commission) Universities, Affiliated Colleges, Government Colleges/ Institutes of Science etc." या मथळ्याचा व "GOVERNMENT OF MAHARASHTRA Higher & Technical Education Department, Resolution No. NGC 2009/(243/09)-UNI-1, Mantralaya Annex, Mumbai 400 032. Date: 12th August 2009" या क्रमांकाचा व दिनांकाचा शासननिर्णय निर्गमित झाला. (यापुढे २००९ चा शासननिर्णय असा उल्लेख) या शासननिर्णयाच्या परिच्छेद १४ मध्ये "This Government Resolution is according to the decision taken by the **State Government** on the scheme forwarded by Government of India by its letter dated 31.12.2008." असा स्पष्ट उल्लेख आहे. त्याच शासननिर्णयाच्या परिच्छेद १४ मध्ये असाही उल्लेख आहे की, "**These orders issue with the concurrence of the Finance Department vide their unofficial reference No.395/SER.9, dated 10.08.2009**" याचा सरळ अर्थ असा आहे की, हा शासननिर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर निर्गमित झाला आहे. तर मग या शासननिर्णयाची दोन अडीच वर्षे अम्मलबजावणी का होत नाही? ही कुंभकर्णी झोप घेणारे अधिकारी आंदोलन सुरु झाल्यानंतरच चार महिन्यानी का जागे होतात?

**८.२.३** सन २००९ चा शासननिर्णय १२ ऑगस्ट २००९ रोजी निघाला. नविन शासननिर्णयाप्रमाणे वेतननिश्चिती होवून प्रत्यक्ष सुधारित वेतनानुसार वेतन देणे माहे फेब्रुवारी २०१० पासून सुरु झाले. सन २००९ च्या या शासननिर्णयाच्या परिच्छेद ९ मध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट तरतुद आहे. :-

"**(9) Date of Implementation of revised pay and allowance and payment of arrears:-**

(i) The revised scales of pay and revised rates of Dearness Allowance under this scheme shall be effective from 1.01.2006 and the non-compounded advance increments / special allowances as applicable shall take effect from 1.09.2008.

**(ii) Pay in the revised pay structure is payable in cash from 1st day of April 2009.**"

"२००९ च्या ह्या शासननिर्णयाप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी १ जानेवारी २००६ पासून लागू होईल व १ एप्रिल २००९ पासून चे सुधारित वेतन रोखीने दिले जाईल." अशी तरतुद आहे.

**८.२.४** प्रत्यक्षात फेब्रुवारी २०१० पासून सुधारित वेतन मिळणे सुरु झाले असले तरी १ एप्रिल २००९ पासून तर ३१ जानेवारी २०१० या काळातील फरक रोखीने द्यावयाचा आहे. अशी स्पष्ट तरतुद २००९ च्या शासननिर्णयाच्या परिच्छेद ९ मध्ये आहे. ती पुढील प्रमाणे :-

"**(ii) Pay in the revised pay structure is payable in cash from 1st day of April 2009.**" वित्त विभागाची मान्यता झाली, मंत्रिमंडळाची मान्यता झाली, शासननिर्णयात स्पष्टपणे १ एप्रिल २००९ पासून सुधारित वेतन रोखीने द्यावे असे नमुद असतांना गेल्या ३२ महिन्यात हा फरक का अदा करण्यात आला नाही? हा खरा प्रश्न आहे? शासननिर्णयाची अम्मलबजावणी करणे ही उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची जबाबदारी नाही काय?

**८.२.५** सन २००९ च्या शासननिर्णयाप्रमाणे एप्रिल २००९ ते जानेवारी २०१० अशी १० महिन्याची थकबाकी रोखीने देण्याबाबतचे आदेश ३२ महिन्यापूर्वी निर्गमित झालेले असतांना आंदोलन सुरु झाल्यानंतर चार महिन्यांनी उच्च शिक्षण विभागातील विद्वान अधिकाऱ्यांनी आता १९ एप्रिल २०१२ ला जो शासननिर्णय काढला त्याच्या परिच्छेद तीन मधील तरतुद पुढील प्रमाणे :-

"३. शिक्षकांना दि. १.४.२००९ ते दि. ३१.१.२०१० या कालावधीत रोखीने देय रक्कम. एकूण खर्च रु. ५२२.४० कोटी, त्यातील रु. १०४.४८ कोटी (२० टक्के) राज्य शासनाकडून देय आहे. त्यापैकी माहे फेब्रुवारी आणि मार्च २०१० या कालावधीतील वेतन फरकाची रक्कम रोखीने देण्यासाठी शासनाने रु. ८७.०६ कोटी एवढी रक्कम यापूर्वीच अदा केली असून राज्य शासनाच्या हिश्याची उर्वरीत रक्कम या आदेशाव्दारे देण्यात येत आहे." असे नमुद करुन पुढे या कामासाठी १७.४२ कोटी रुपयाची तरतुद स्तंभ ३ मध्ये नमुद केलेली

आहे.

**८.२.६** १९ एप्रिल २०१२ चा शासननिर्णय काळजीपूर्वक पाहिला तर त्याच्या परिच्छेद ३ मध्ये १.४.२००९ ते ३१ जानेवारी २०१० या कालावधीची रक्कम ५२२.४० कोटी रुपये दाखविली असून त्यापैकी फक्त २० टक्के म्हणजे १०४.४८ कोटी रुपये राज्य शासनाला द्यावयाचे आहेत असे दाखविले आहे. वस्तुतः हे २००९ च्या शासननिर्णयाच्या विरोधात आहे कारण त्या शासननिर्णयात स्पष्टपणे "**(ii) Pay in the revised pay structure is payable in cash from 1st day of April 2009.**" अशी तरतुद आहे. आता २० टक्के म्हणून जी १०४.४० कोटीची रक्कम १.४.२००९ ते ३१ जानेवारी २०१० या कालखंडासाठी देण्याचे जे चुकीचे व २००९ च्या शासन निर्णयाच्या विरोधात जाणारे गणित २०१२ च्या शासननिर्णयात मांडले त्यात सुद्धा "फेब्रुवारी व मार्च २०१० या कालावधीतील वेतन फरकाची ८७.०६ कोटी रुपयाची रक्कम शासनाने अदा केली असल्याने १०४.४८ कोटीमधून कापून घेतली आहे." म्हणजे (१०४.४८ - ८७.०६) = १७.४२ कोटी रुपयाची तरतुद २०१२ च्या या शासन निर्णयात करण्यात आली आहे. **असे करतांना फेब्रुवारी व मार्च २०१० हे दोन महिने १ एप्रिल २००९ ते ३१ जानेवारी २०१० या कालखंडाचा भाग म्हणून या शासननिर्णयाद्वारे जाहिर करण्याची जी अलौकीक कामगीरी उच्च शिक्षण विभागाच्या विद्वान अधिकाऱ्यांनी पार पाडली त्याचा करावा तेवढा गौरव थोडाच आहे.**

**८.२.७** वित्त विभागाच्या सहमतीने व मंत्रिमंडळाच्या मान्यतेने निर्गमित झालेला २००९ चा शासननिर्णय जिवंत असतांना, तो रद्द झालेला नसतांना किंवा दुरुस्त झालेला नसतांना १ एप्रिल २००९ ते ३१ जानेवारी २०१० या कालखंडासाठी त्या शासननिर्णयात "**Pay in the revised pay structure is payable in cash from 1st day of April 2009.**" अशी तरतुद असतांना :-

(१) त्या तरतुदीप्रमाणे सन २००९ मध्ये ५२२ कोटी रुपये वितरीत न करता २०१२ च्या एप्रिल मध्ये १०४.४८ कोटी रुपयाची तरतुद करणे, ही या शासननिर्णयातील क्रमांक एकची हास्यास्पदता होय

(२) या कालखंडासाठी शंभर टक्के थकबाकी देण्याची २००९ च्या शासननिर्णयाने तरतुद केली असतांना २० टक्क्याच्या तरतुदीचा शासननिर्णय काढणे, हा या शासननिर्णयातील क्रमांक दोनचा हास्यास्पदपणा होय.

(३) १ एप्रिल २००९ ते ३१ जानेवारी २०१० या कालखंडासाठी करण्यात आलेल्या १०४.४८ कोटी रुपयाच्या तरतुदीतून फेब्रुवारी व मार्च २०१० हे महिने त्या कालखंडाचा भाग समजून या दोन महिन्याची ८७.०६ कोटी रुपयाची रक्कम १०४.४८ कोटी रुपयातून कापून घेणे याला हास्यास्पद म्हणणेसुद्धा हास्यास्पद वाटावे एवढा हा प्रकार हास्यास्पद आहे.

**८.३.१** गेल्या १०-१५ वर्षात कधी असा प्रकार पहायला मिळाला नव्हता. उच्च शिक्षण संचालकांच्या गलथान कारभारामुळे अनेक महाविद्यालयामध्ये मासिक वेतन अक्षम्य विलंबाने होत आहे. तत्कालीन उच्च शिक्षण संचालकांनी दिनांक ११ एप्रिल २००५ रोजी "**खाजगी अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे एक तारखेस वेतन देणे बाबत**" या विषयावर एक परिपत्रक (क्रं. उशिसं/२००५/लेखा -२) काढून "....परंतु शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मात्र १ तारखेस वेतन मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. या बाबतीमध्ये संचालनालय अथवा **विभागीय सहसंचालक कार्यालय यांच्या स्तरावर येथून पुढे हलगर्जीपणा होता कामा नये**" असे बजावले होते व त्याच परिपत्रकात "त्यामुळे वेतनास विलंब झाला तर संबंधीतावर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी. संबंधित कर्मचारी अथवा अधिकाऱ्यावर कामात कसूर केल्यामुळे निलंबनाची देखील कारवाई होऊ शकते, याची संबंधितांनी नोंद घ्यावी." असा गंभीर इशारा दिला होता. याच परिपत्रकान्वये "ज्या विभागीय कार्यालयाकडून दुसऱ्या आठवड्यामध्ये कोषागारात देयके सादर होणार नाहीत. त्या विभागीय कार्यालयास कसूर म्हणून जबाबदार धरण्यात येईल." व पुढे "**चौथ्या आठवड्याच्या चौथ्या, पाचव्या व सहाव्या दिवशी धनाकर्ष हे त्या त्या महाविद्यालयात पोहचतील अशा पद्धतीचे नियोजन विभागीय सहसंचालक कार्यालयाने करावे.** वरील पद्धतीने कामाचे नियोजन देखरेख अधिकाऱ्याने करावे, म्हणजे राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना एक तारखेस पगार देण्यात येईल याची खबरदारी घ्यावी." अशी व्यवस्था उच्च शिक्षण संचालकांनी घालून दिली होती. आज हे परिपत्रक जिवंत असले तरी स्थापित केलेल्या साऱ्या व्यवस्था कोलमडून पडल्या आहेत. असे स्पष्टपणे दिसून येते.

**८.३.२** "A scheme to ensure regular and full payment by College Managements of the salary and allowances of the teaching and non-teaching staff of aided non-Government Colleges of Arts, Science, Commerce *and Education in Maharashtra.*" या मथळ्याचा महाराष्ट्र शासनाचा "Resolution No. NGC-1277/122166/ XXXII (Cell)" या क्रमांकाचा २१ सप्टेंबर १९७७ रोजीचा याबाबतचा शासननिर्णय आहे. त्या शासननिर्णयाच्या परिच्छेद २ मध्ये "The Director of Education (Higher Education), Maharashtra State, Pune, shall be in overall charge of the administration of and supervision over the scheme." अशी उच्च शिक्षण संचालकांची जबाबदारी निश्चित करण्यात आली असून त्याच तारखेला व त्याच तारखेचा "Strengthening of the Directorate of Education (Higher Education)" या मथळ्याचा व "Resolution No. NGC 1277/123253/XXXII (cell)" या क्रमांकाचा शासननिर्णय काढून शासनाने उच्च शिक्षण संचालकांच्या क्षेत्रिय कार्यालयाचे मजबुतीकरण उच्च शिक्षण संचालकांना करुन दिले. ते या योजनेची अम्मलबजावणी करण्यासाठीच होय. दुर्दैवाने उच्च शिक्षणसंचालकांच्या कार्यालयाला नेमका या कामाचा विसर पडला. **गेल्या काही महिन्यात मासिक वेतन विलंबाने होण्याच्या या प्रकाराची चौकशी व्हावी व जबाबदार अधिकाऱ्यावर कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे.**

**९.** विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचे अनेक प्रश्न गेल्या अनेक दिवसापासून प्रलंबीत आहेत. ते पुढील प्रमाणे :-

१) दि. १९/०९/१९९१ ते दि. ०३/०४/२००० दरम्यान नियुक्त प्राध्यापकांच्या बाबतीत विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. १६ ऑगस्ट २०११, २६ ऑगस्ट २०११ व १५ मार्च २०१२ रोजीच्या पत्रान्वये दिलेले निर्देश व स्पष्टीकरण यांची अंमलबजावणी करण्यासाठी त्वरीत शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा.

२) दि. १९/०९/१९९१ ते दि. ०३/०४/२००० दरम्यान नियुक्त नेट/सेट मुक्त प्राध्यापकांच्या सेवा नियुक्तीच्या दिनांकापासून धरुन त्यांची वेतन निश्चिती व स्थाननिश्चिती करण्यात यावी याबाबतचा शासन निर्णय त्वरीत निर्गमित करण्यात यावा.

३) केंद्र शासनाने दि. १४ ऑगस्ट २०१२ रोजी शासन निर्णय (No.F.1-7/2010-U II) नुसार सर्व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना (नेट/सेट मुक्त शिक्षक धरुन) नविन वेतन श्रेणीच्या थकबाकी पोटी येणाऱ्या रक्कमेच्या ८० टक्के रक्कम देण्याचे मान्य करण्यात आले आहे. त्याबाबत राज्य शासनाने शासनस्तरावर करावयाची कार्यवाही पूर्ण करावी.

४) केन्द्रीय मानव संसाधन विभागाने दि. ३१ डिसेंबर २००८ रोजी निर्गमित केलेल्या वेतनपुनर्रचना आदेशानुसार महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी समग्र योजनेची काटेकोर अंमलबजावणी करावी.

५) समाजकार्य महाविद्यालयात कार्यरत असलेल्या शिक्षकांना दिनांक २२ सप्टेंबर २०११ रोजी म्हणजे २५ महिन्याच्या विलंबाने सहावा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. केंद्र शासनाने दि. १४ ऑगस्ट २०१२ रोजी शासन निर्णय (No.F.1-7/ 2010-U II) नुसार सर्व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना (नेट/ सेट मुक्त शिक्षक धरुन) नविन वेतन श्रेणीच्या थकबाकी पोटी येणाऱ्या रक्कमेच्या ८० टक्के रक्कम देण्याचे मान्य करण्यात आले आहे. त्याबाबत राज्य शासनाने शासनस्तरावर करावयाची कार्यवाही पूर्ण करावी. तसेच

१.४.२०१० ते ३१.३.२०१२ या कालखंडातील थकबाकीची रक्कम त्वरीत अदा करण्यात यावी.

६) एआयसीटीई व केंद्रीय मानव संसाधन विभाग यांचेकडून सहाव्या वेतन आयोगाबाबत आदेश प्राप्त झाले असल्याने राज्यातील सर्व विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाचे लाभ देण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी.

७) राज्यातील अनुदानित अशसकिय शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याबाबत महाराष्ट्र शासनाचा शासननिर्णय दिनांक २४ नोव्हेंबर २०११ रोजी निर्गमित करण्यात आला. सदर शासननिर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दिनांक १२ ऑगस्ट २००९ च्या शासननिर्णयाशी व दि. २६ ऑगस्ट २००९ रोजी झालेल्या मतैक्य पत्राशी विसंगत असल्यामुळे त्यात आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यात याव्यात.

८) मा. उच्च न्यायालयाने अनेक प्रकरणामध्ये दिलेलया निर्णयानुसार महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगानुसार रु. १४९४०/- चे वेतननिश्चिती व कुंठीत वेतनवाढीचे लाभ त्वरीत देण्यात यावेत.

९) दिनांक ०१.०१.१९८६ ते ३१.०५.१९९५ दरम्यान पीएच.डी. व एम.फील. धारक विद्यापीठातील व महाविद्यालयातील शिक्षकांना मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या निर्देशानुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार वेतन वाढी देण्यात याव्यात.

१०) सेवा निवृत्तीचे वय ६० वरुन ६५ करण्याच्या बाबतीत महाराष्ट्र शासनाने केंद्रिय निर्देशानुसार कोणत्याही अटींशिवाय शासन निर्णय त्वरीत निर्गमित करण्यात यावा.

११) राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठातील व संलग्न महाविद्यालयातील शिक्षकांचे पगार दरमहा १ तारखेला अदा व्हावेत असे आदेश असतांना व जे शिक्षण संचालकांना बंधनकारक आहेत त्याची काटेकोर अंमलबजावणी व्हावी.

१२) महागाई भत्त्यातील वाढ जी केंद्रशासन जाहिर करते किंवा राज्य शासन इतर राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना जाहीर करते ती वाढ विद्यापीठातील व महाविद्यालयातील शिक्षकांना विनाविलंब लागू करण्यात येईल असे निर्देश असतांना त्याची अंमलबजावणी होत नाही. त्याबाबत शासनाने आपल्याच आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करावी.

**१०. एक म्हणजे** नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत वारंवार दिलेल्या लेखी अभिवचनांचे पालन न होणे, दुसरे म्हणजे नविन वेतनश्रेणीमुळे नेट-सेट मुक्त शिक्षकांसह सर्व शिक्षकांच्या बाबतीत १ जानेवारी २००६ पासून पुढच्या चार-पाच वर्षासाठी येणाऱ्या थकितबाकीचा ८० टक्के अंशभाग सोसायला केंद्र शासन तयार आहे असा शासननिर्णय केंद्राने काढला असतांना याबाबत आकसपूर्ण भूमिका घेतलेल्या उच्च शिक्षण विभागातील नोकरशाहीने कोणतीही कारवाई न करणे, आणि **तिसरे म्हणजे** प्रत्यक्ष निर्गमित झालेल्या शासननिर्णयाची अंमलबजावणी न होणे, तसेच या स्तरावरील शिक्षकांच्या प्रलंबीत असलेल्या विविध समस्या व प्रश्नांविषयी नोकरशाहीच्या आकसपूर्ण धोरणाविरुद्ध तीव्र संघर्ष करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात येत आहे. आज रविवार, दिनांक १६ सप्टेबर २०१२ रोजी झालेल्या महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या (MFUCTO) कार्यकारी मंडळाच्या बैठकीत पुढीलप्रमाणे आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला आहे :-

(१) बुधवार, दिनांक १० ऑक्टोबर २०१२ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे सकाळी ११ ते २ वाजेपावेतो **राज्यस्तरीय धरणे आंदोलन** आयोजित केले जाईल.पूर्व सूचनेने मा. उच्च शिक्षणमंत्र्यांशी वेळ ठरवून त्यांना मंत्रालयात भेटून संघटनेचे पदाधिकारी आंदोलनाचा ठराव सादर करतील. त्यांनी वेळ न दिल्यास, मा. उच्च शिक्षण राज्यमंत्री यांना भेटून किंवा त्यांनीही वेळ न दिल्यास उभय मंत्र्यांच्या कार्यालयात आंदोलनाचा ठराव सपत्र सादर केला जाईल. त्याच दिवशी राज्याचे मा. मुख्यमंत्री यांना प्रत्यक्ष भेटून ठरावाची प्रत सादर करण्यात येईल.

(२) दिनांक १० ऑक्टोबर २०१२ ते १ नोव्हेंबर २०१२ या कालखंडामध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी संलग्न असलेल्या सर्व विद्यापीठस्तरीय संघटना आपआपल्या मुखपत्राचा "**आंदोलन विशेषांक**" प्रकाशित करतील. या विशेषांकामध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने सम्मत केलेला आंदोलनाचा ठराव व तो ठराव राज्याचे मा. मुख्यमंत्री व मा. उच्च शिक्षण मंत्री यांना सादर करणारे पत्र, शब्दशः प्रकाशित करण्यात येईल. त्याच विशेषांकात जिल्हास्तरीय व विद्यापीठ स्तरीय मेळाव्यांचा कार्यक्रम प्रकाशित करण्यात येईल. या अंकात प्रसिद्ध करावयाचा आंदोलन विषयक इतर मजकुर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या किंवा त्या त्या विद्यापीठस्तरीय संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी ठरविल्याप्रमाणे असेल.

(३) दिनांक १ नोव्हेंबर २०१२ ते २६ नोव्हेंबर २०१२ या कालखंडात विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या **जिल्हा मेळाव्यांचे आयोजन** केले जाईल. अ.न. जिल्ह्याचे नाव, मेळाव्याचे ठिकाण, मेळाव्याचा दिवस, दिनांक व वेळ यांचा समावेश असलेला महाराष्ट्रातील या सर्व जिल्हा मेळाव्यांचा कार्यक्रम हा आंदोलन विशेषांकामध्ये प्रकाशित केल्याप्रमाणे असेल. या सर्व जिल्हा मेळाव्यांना विद्यापीठस्तरीय संघटनेचे पदाधिकारी व नेते संबोधित करतील.

(४) **सोमवार, दिनांक ५ नोव्हेंबर, २०१२ रोजी उच्च शिक्षण संचालक पुणे यांच्या कार्यालयावर राज्यस्तरीय मोर्चाचे आयोजन करण्यात येईल.** शासन निर्णयाने त्यांचेकडे सोपविलेली जबाबदारी पार पाडण्यात त्यांना आलेल्या अपयशाचा निषेध करणे हा या मोर्चाचा उद्देश असेल. उच्च शिक्षण संचालकांना शासननिर्णय निर्गमित होऊनही त्यांना नियंत्रणात ठेवण्यात उच्च शिक्षण मंत्री अपयशी झाल्यामुळे, **उच्च शिक्षण मंत्री महाराष्ट्रात कोठेही जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी सभा/कार्यक्रमाच्या वेळी उपस्थित असतील त्या वेळी याच तारखेपासून तीव्र निदर्शने केली जातील.**

(५) जिल्हा मेळाव्यांचा कार्यक्रम ज्या कालखंडात होत आहे त्याच कालखंडात **विद्यापीठस्तरीय मेळाव्यांचे आयोजन** विद्यापीठस्तरीय संघटनेकडून केले जाईल. या मेळाव्याला राज्यस्तरीय संघटनेचे पदाधिकारी व नेते संबोधित करतील. कोणत्याही परिस्थितीत हा कार्यक्रम ५ डिसेंबर २०१२ या तारखेच्या पुढे जाणार नाही याची काळजी घेण्यात येईल.

(६) दिनांक १ नोव्हेंबर २०१२ ते २६ नोव्हेंबर २०१२ या कालखंडामध्ये जिल्हास्तरीय नेते आपापल्या **जिल्ह्यामध्ये आंदोलनाच्या प्रचारासाठी दौरे** करतील.

**(७) सोमवार, दिनांक १० डिसेंबर २०१२ रोजी नागपूर येथे विधानमंडळ अधिवेशनाच्या वेळी राज्यस्तरीय मोर्चाचे आयोजन केले जाईल.**

(८) **संपर्क पंधरवाडा :** बुधवार, दिनांक १२ डिसेंबर २०१२ ते बुधवार, दिनांक २६ डिसेंबर २०१२ या १५ दिवसात संपर्क पंधरवाडा आयोजित करण्यात येईल. या कालखंडात (१) राज्यस्तरीय, विद्यापीठस्तरीय व जिल्हास्तरीय पदाधिकारी त्या त्या स्तरावरील वृत्तपत्रे व दुरदर्शनच्या कार्यालयात वेळ निश्चित ठरवून जातील व त्या माध्यमांच्या जबाबदार व्यक्तिंना आपली बाजू समजावून सांगतील. असे करतांना या संदर्भातील सर्व कागदपत्रांच्या प्रती माध्यमांच्या सुपूर्त करतील. (२) याच कालखंडात विद्यार्थी व पालकांच्या सभांचे आयोजन करुन सर्व कागदपत्रासह आपली बाजू संघटनांचे प्रतिनिधी समजावून सांगतील

(९) मंगळवार, दिनांक १ जानेवारी २०१३ पासून महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक, राज्य **मंत्रीमंडळातील कोणत्याही मा.मंत्रिमहोदयांनी जिल्ह्याच्या ठिकाणी सार्वजनिक समारंभात/कार्यक्रमात सहभाग घेतला असेल तर त्या समारंभ स्थळी/कार्यक्रम स्थळी नोकरशाहीच्या मनोवृत्तीचा धिक्कार म्हणून व अशा मनोवृत्तीला आवर घालण्यास शासनाला आलेल्या अपयशाच्या विरोधात महासंघातर्फे तीव्र निदर्शने केली जातील.**

| | |
|---|---|
| **(प्रा. शिवाजीराव पाटील)** | **(डॉ. तापती मुखोपाध्याय)** |
| *अध्यक्ष* | *सचिव* |

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

******

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO) Affiliated to the AIFUCTO**

Vidyapeeth Vidyarthi Bhavan, 'B' Road, Churchgate, Mumbai – 400 020

## उच्च शिक्षण संचालक, पुणे यांच्या कार्यालयावर राज्यस्तरीय

# मोर्चा

## सोमवार,

## दिनांक ५ नोव्हेंबर २०१२

**उच्च शिक्षण संचालक कार्यालय, पुणे : दुपारी १२ वाजता**

आयोजित करण्यात आला आहे.

**********

## विधानमंडळ अधिवेशनाच्या वेळी नागपूर येथे

# राज्यस्तरीय मोर्चा

## सोमवार,

## दिनांक १० डिसेंबर २०१२

**नुटा ऑफीस, डि. लक्ष्मीनारायण बंगला, अमरावती रोड, नागपूर येथून दुपारी १२ वाजता निघेल**

**प्रा. शिवाजीराव पाटील** *(अध्यक्ष)*

**डॉ. ताप्ती मुखोपाध्याय** *(सचिव)*

## NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

**जिल्हा कार्यकारिणी व तालुका कार्यकारिणीच्या तातडीच्या सभा**

संघटनेच्या जिल्हा कार्यकारी मंडळांच्या व तालुका कार्यकारी मंडळांच्या तातडीच्या बैठकी आयोजित करण्यात याव्यात. जिल्हा पदाधिकाऱ्यांनी व तालुका पदाधिकाऱ्यांनी आपआपल्या जिल्ह्यांमध्ये व तालुक्यांमध्ये दौरे आयोजित करुन महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या ठरावानुसार निश्चित झालेले आंदोलन यशस्वी करण्यासाठी कार्यरत व्हावे **अशी विनंती करण्यात येत आहे.**

स्वा / **प्रा. प्रवीण रघुवंशी**, *अध्यक्ष*

स्वा / **डॉ. अनिल ढगे**, ***सचिव***

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2012-14 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **01.10.2012**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 602**.

---------------------------------------------------

To,..........................................................................

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

.................................................................................